दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
● वर्ष १५ वे ● अंक ३१६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● मंगळवार दि.९ फेब्रुवारी २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## 'मी पुन्हा येईन' म्हणणाऱ्या देवेंद्र फडणवीसांच्या स्वप्नाला अजून २५ वर्ष लागतील : नवाब मलिक

**दै.रायगड नगरी । मुंबई**

'मी पुन्हा येईन' म्हणणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांच्या स्वप्नाला अजून २५ वर्ष लागतील, असा टोला राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि अल्पसंख्याक मंत्री नवाब मलिक यांनी लगावला. आम्ही फासे फिरवणार आहोत असे भाजप नेते सांगत आहेत. कुठले फासे फिरवणार आहेत हे आम्हाला माहीत नाही, असाही उपरोधिक टोलाही नवाब मलिक यांनी लगावला. गेले २२ वर्ष नारायण राणे मुख्यमंत्री बनण्याची स्वप्न बघत आहेत. परंतु फासा काही फिरवता आला नाही आणि मुख्यमंत्री होता आले नाही. आता त्यांच्या जोडीला देवेंद्र फडणवीस आले आहेत. त्यांनाही मुख्यमंत्री पद-ाची स्वप्न पडत आहेत. स्वप्न पाहणे हा त्यांचा अधिकार आहे आणि फडणवीस यांचे 'मी पुन्हा येईन' ची स्वप्ने पूर्ण होणार नाही. कारण उद्धव ठाकरे यांनी सरकार बनवताना सांगितले होते की सरकार पाच वर्षे नाही तर हे सरकार २५ वर्ष टिकणार आहे आणि तेच घडणार आहे, असे नवाब मलिक यांनी स्पष्ट केले.

# श्री. स्वयंभू गणेश मंदिराचे विमानतळ पुनर्वसन क्षेत्रात उद्घाटन सोहळा संपन्न



**दै.रायगड नगरी । नवीमुंबई**

कोपर गावाच्या गणेश मंदिराची पुनर्वसन क्षेत्रामध्ये पुन:स्थापना झाल्याचा तसेच विमानतळबाधित गावांतील ग्रामस्थांचा धार्मिक व सांस्कृतिक ठेवा आता नव्या रूपात जतन होत असल्याचा आनंद ग्रामस्थांप्रमाणेच सिडकोलाही आहे, असे उद्गार डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी काढले. पुष्पक नोड या नवी मुंबई विमानतळबाधितांच्या पुनर्वसन आणि पुन:स्थापना क्षेत्रात उभारण्यात आलेल्या कोपर गावाच्या श्री स्वयंभू चिंतामणी गणेश मंदिराचे उद्घाटन डॉ. संजय मुखर्जी यांच्या शुभहस्ते ०८ फेब्रुवारी, २०२१ रोजी करण्यात आले त्या वेळी त्यांनी हे उद्गार काढले. विमानतळबाधित कोपर गावाच्या श्री स्वयंभू चिंतामणी मंदिर हे भूखंड क्र.५३, सेक्टर-आर४, पुष्पक नोड, येथे उभारण्यात आले आहे. या प्रसंगी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक श्री. अश्विन मुद्गल उपस्थित होते.

भारताच्या इतिहासात प्रथमच प्रकल्पबाधितांच्या चेहऱ्यावर मंदीराचे नवीन जागी उद्घाटन करताना आनंद, उत्साह व समाधान यांचे मिश्रण पहायला मिळाले. याचे कारण म्हणजे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प व अनुषंगिक कामासाठी स्थलांतरीत होणाऱ्या बांधकामाबद्दल प्रकल्पबाधितांना २२.५% व पुनर्वसन व पुनः स्थापना योजनेंतर्गत देशातील सर्वोत्तम पॅकेज देण्यात आले आहे. कोपर गाव ग्रामस्थांनीदेखील एक पाऊल पुढे येऊन नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा हा आंतरराष्ट्रीय दर्जाचा महत्वाकांक्षी प्रकल्प मार्गी लावण्यास मोलाचे सहकार्य केले आहे.

प्रकल्पबाधितांना देण्यात येणाऱ्या सर्वोत्तम पॅकेजसोबतच प्रकल्पबाधितांच्या गाव मंदिरांसाठी सिडकोतर्फे पुनर्वसन व पुन:स्थापना क्षेत्रात भूखंडदेखील देण्यात आले आहेत. विमानतळ प्रकल्पबाधित सर्व दहा गावांच्या मागण्यांनुसार त्यांच्या गावांमधील सर्व मंदिरांसाठी एक भूखंड देण्यात आला आहे. सिडकोतर्फे गावातील मुख्य मंदिराच्या बांधकामासाठी रू. १ कोटी देण्यात आ-लेले आहेत. सिडकोने नेहमीच प्रकल्पबाधितांच्या सर्वंकष पुनर्वसनावर भर दिला आहे. याचाच



परिपाक म्हणजे प्रकल्पबाधितांची सामाजिक गरज लक्षात घेऊन त्यांच्या मंदिरांसाठी सिडकोतर्फे भूखंड व मंदिर बांधकामासाठी निधी अदा केला आहे.

## संक्षिप्त...

### दाऊदपेक्षा खतरनाक डॉन बनायचं होतं; एनसीबीने आवळल्या मुसक्या

**दै.रायगड नगरी । मुंबई**

नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरोने (एनसीबी) शनिवारी मुंबईतील लोखंडवाला परिसरातून एका गँगस्टरला अटक केली आहे. तो ड्रग पेडलर देखील आहे. आरोपीचे नाव इब्राहिम मुजावर असं आहे. त्याने आपलं दुसरं नाव इब्राहिम कासकर असं ठेवलं होते. इब्राहिम कासकर हे नाव अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या वडीलांचे नाव आहे. इब्राहिम आपल्या मर्सिडीज कारमधून ड्रग्स सप्लाय करत असे. ती कार एनसीबीने जप्त केली आहे.

खरंतर, एनसीबीने दक्षिण मुंबईतील डोंगरी येथे तीन ठिकाणी छापे मारले. तेथे इब्राहिमला चरस या ड्रग्ससह अटक केली. एनसीबीच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, प्राथमिक तपासात इब्राहिमने त्याच्याकडे सापडलेला चरस हा डोंगरातील आसिफ राजकोटवालाकडून मिळाल्याची माहिती दिली. त्यानंतर एनसीबीच्या पथकाने डोंगरी येथून आसिफ राजकोटवालाला अटक केली. आसिफकडून चरस देखील एनसीबीने जप्त केला.

इब्राहिम आणि आसिफ हे गेल्या वर्षभरापासून एकमेकांसाठी ड्रग्सकरिता काम करत होते. इब्राहिमविरोधात मुंबईतील स्थानिक पोलीस ठाण्यात पोलीस कर्मचाऱ्यांवर हल्ला आणि हत्या करण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी भादंविअन्वये खटला सुरु आहे. सध्या इब्राहिम जामिनावर बाहेर आहे. एनसीबीच्या अधिकाऱ्यांना संशय आहे की, आसिफ आणि इब्राहिम एका मोठ्या ड्रग मोड्युलचा भाग आहेत. त्यांची चौकशी सुरु आहे. इब्राहिमसाठी काम करणाऱ्या पश्चिम उपनगरातील इतर ड्रग्स पेडलर्स यांची चौकशी देखील सुरु आहे.

## गिर्यारोहणासाठी गेलेल्या एकाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

गिर्यारोहणासाठी गेलेल्या दोघा मित्रांपैकी एकाचा मृत्यू झाला आहे. तर त्याचा सहकारी रस्ता चुकला असल्याने निसर्ग मित्र मंडळ पनवेल व पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या पथकाने त्याला सुखरूप खाली आणले आहे.

तालुक्यातील चंदेरी डोंगरावर गिर्यारोहण करण्यासाठी वैभव कवडे (२४ रा.ऐरोली) व त्याचा मित्र सागर भिलारे (२४, रा.मुलूंड) हे दोघे गेले असताना मध्य रस्त्यावर या दोघे पुढे मागे झाले. यावेळी सागर भिलारे याने वैभवशी मोबाईलवरुन संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. परंतु तो संपर्कात आला नाही. त्यामुळे पुढे गेलेल्या सागर भिलारेने याबाबतची माहिती आपल्या कुटुंबियांना दिली. तसेच पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. या घटनेची माहिती मिळताच वपोनि रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली सहा.पो. नि.गोपाळ, पोलीस हवालदार रवींद्र म्हात्रे व पथकाने त्वरित निसर्ग मित्र मंडळ पनवेलशी संपर्क साधला व या दोघांचा शोध घेतला असताना सागर भिलारे हा कपारीत अडकलेल्या अवस्थेत आढळून आला.

तर त्याचा मित्र वैभव कवडे हा पाय घसरुन खाली पडल्याने गंभीररित्या जखमी अवस्थेत सापडला. त्याला रुग्णालयात आणले असताना तेथे त्याला मृत घोषित करण्यात आले आहे. याबाबतची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## उरणमध्ये तेल तस्करांच्या मुसक्या आवळल्या






**दै.रायगड नगरी । जेएनपीटी**

उरण मोरा सागरी पोलीस ठाण्यामध्ये तेल तस्करांविरोधात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून, आरोपींच्या मुसक्या आवळण्यात आल्या आहेत. सदरची कारवाई पनवेल क्राईम झोन २ च्या माध्यमातून करण्यात आली आहे.

उरण तालुक्याला मोठा सागरी किनारा लाभला आहे. तर जेएनपीटी बंदरासारखे जागतिक स्थरा-वरचे बंदरही याच हद्दीमध्ये आहे. यामुळे येथील सांगती भागामध्ये मोठ्याप्रमाणात जहाजांची वर्दळ सुरू असते. याचाच फायदा घेत येथील सागर किनार्यावर तेल तस्कर सक्रिय झाले आहेत. या तेल तस्करांच्या माध्यमातून समुद्रामध्ये उभ्या असणाऱ्या जहाजांमधून तेल काढून या तेलाची तस्करी करण्यात येते.

सदरची तस्करी उरणच्या किनार्यावरून होत असून, येथील तस्करांचा शोध अनेक वर्षं सुरू आहे. रविवारी मध्यरात्री पनवेल क्राईम झोन २ च्या एका पथकाने उरणच्या पणजा खाडीमध्ये धाड टाकून कारवाई करत तेल तस्करीसाठी वापरात आलेली बोट आणि तीन हजार लिटर मोटर स्पिरिट तसेच हायस्पीड डिझेल असा एकूण १२ लाख ४० हजारांचा मुद्देमाल ताब्यात घेण्यात आला आहे. तर या तस्करीमधील अखिलेश वसंत रावकुमार, लक्ष्मन पप्पू वाल्मिकी (चेटा) आणि दिनेश अर्जुन गायकवाड (कड्या) या तिघांना ताब्यात घेण्यात आले असून, भा.द.वी कलम २८६, ३४ सह जीवनावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३७ सह मोटार स्पिरिट अँड हायस्पीड डिझेल ऑर्डर २००५ चे क्लॉज ३ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## सुधागड तालुक्याच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून देणार : ना.आदिती तटकरे

### सुधागड तालुक्यातील वाघोशी ग्रामपंचायत नुतन कार्यालय व अंगणवाडीचे शानदार उदघाटन

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्याच्या सर्वांगीण व शाश्वत विकासासाठी भरीव निधी उपलब्ध करून देणार असल्याची ग्वाही पालकमंत्री आदिती तटकरे यांनी दिली. सुधागड तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वाघोशी ग्रामपंचायत कार्यालयाच्या नव्या सुसज्ज व देखण्या इमारतीचे तसेच नव्याने बांधण्यात आलेल्या अंगणवाडी इमारतीचे शानदार उदघाटन पालकमंत्री ना. आदिती तटकरे, माजी आमदार धैर्यशील पाटील, अर्थ व बांधकाम सभापती अॅड.नीलिमाताई पाटील व अन्य प्रतिष्ठित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी ना. तटकरे बोलत होत्या. तटकरे पुढे म्हणाल्या सी. एस.आर फंडातून ग्रामपंचायत इमारत उभी राहिली हे कौतुकास्पद आहे.ग्रामपंचायतीच्या इमारतीतून खऱ्या अर्थाने जनतेचे प्रश्न सुटतात, त्यामुळे ही इमारत सुसज्ज असणे गरजेचे आहे. वाघोशी ग्रामपंचायतीचे अपूर्ण काम पूर्ण करण्याची जबाबदारी आम्ही स्वीकारली आहे. तसेच अंगणवाडीला लागणारे साहित्य व सुविधा पुरविण्यासाठी जि प च्या माध्यमातून अधिकाधीक निधीची तरतूद केली जाईल. पदे येतात व जातात मात्र पदावर नसताना सामाजिक बांधिलकी जपत लोकांच्या समस्या जाणून घेऊन त्या सोडविणारा खरा लोकप्रतिनिधी असतो. धैर्यशीलदादा पाटील हे कायम लोकांच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर आहेत. निधीसाठी पाठपुरावा करणे, व चांगले काम करून घेणे ही स्थानिकांची जबाबदारी असते. ग्रामपंचायती च्या कार्यालयातून लोकोपयोगी कामे व्हा-वीत. लोकप्रतिनिधींनी जास्तीत जास्त लोकहिताची कामे करावीत. जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यास राष्ट्रवादी शेकाप आघाडी प्रयत्नशील राहिली आहे व राहील असे ना. तटकरे म्हणाल्या. आ. धैर्यशील पाटील म्हणाले की सुधागड तालुक्यातील गाव वाड्यावस्त्यांमध्ये शेकाप व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून विकासगंगा वाहू लागली आहे. आपल्याला निवडून दिलेल्या माणसाच्या घरापर्यंत लोकप्रतिनिधी ने पोहचले पाहिजे. जनतेचे प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी आम्ही कायम कटिबद्ध आहोत असे पाटील म्हणाले. यावेळी सुरेश खैरे यांनी देखील शेकाप राष्ट्रवादी आघाडीने तळागळात पोहचून आजवर केलेल्या विविध विकासकामांची सविस्तर माहिती दिली.



ग्रामपंचायत इमारत बांधण्यासाठी डॉल्फि प्रॉपर्टी समूहाकडून १२ लाख रक्कम उपलब्द करून देण्यात आली. यावेळी धीरज खंडागळे यांच्या सुमधुर स्वागत गीताने तसेच राजेश गायकवाड सर यांच्या अभ्यासपूर्ण व ओघवत्या

..../२

## गोखले हॉल ते मुंबई पुणे हायवे पर्यंत रस्त्याचे नियोजन करण्याची सुरेखा मोहोकर यांची मागणी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १८ मधील स्वामी नित्यानंद मार्गाचे म्हणजेच गोखले हॉल ते मुंबई पुणे हायवे पर्यंतचा रस्त्याचे बारा मीटर वरून १५ मीटर रुंदीकरण करण्यासंदर्भात पनवेल महानगरपालिका मार्फत प्रस्तावित आहे. यासंदर्भात काही सोसायटीचा भाग नियोजित रस्ता रुंदीकरणात जात असल्याचे निदर्शनास आले असता महानगरपालिकेमार्फत सदरच्या सोसायट्यांना आपले म्हणणे मांडण्यासाठी त्यांना पत्राद्वारे वेळ ठरवून बोलवण्यात आले होते.



नगररचना विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांसोबत केलेल्या चर्चेअंती नागरिकांकडून हस्तांतरण करून घेण्यात येणाऱ्या जागेसंदर्भात काही सूचना वजा मागण्या निदर्शनास आले आहेत. त्यानुसार रस्ता हस्तांतरण करताना सोसायटीकडून करून घेण्यात येणाऱ्या बंधपत्र (करारपत्र) व त्याकरिता येणारा खर्च पनवेल महानगर पालिकेने करावा. सोसायटीच्या जागेची मोजणी करणे व त्या सोबत असणारी प्रक्रिया महानगरपालिकेने पूर्ण करावी. रस्ता रुंदीकरण होताना तोडण्यात येणाऱ्या सोसायट्यांचे कुंपण भिंती महानगरपालिकांमार्फत बांधून देण्यात याव्यात या मागण्यांचा विचार करून योग्य ते नियोजन करून अंमलबजावणी करण्याची मागणी नगरसेविका डॉक्टर सुरेखा विलास मोहोकर यांनी पनवेल आयुक्त यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

## मजगांव-मुरुड-आगरदांडा रस्त्याची दुरवस्था

### तातडीने रस्ता दुरुस्ती व डांबरीकरण न झाल्यास भाजपचा रास्तारोको आंदोलनाचा इशारा

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

मुरुड तालुक्यातील मजगांव - मुरुड -तेलवडे, खार आंबोली ते आगरदांडा रस्त्याची पार दुरावस्था झालेली असून या रस्त्याची तातडीने दुरुस्ती व डांबरीकरण न झाल्यास या विरोधात रास्तारोको आंदोलन छेडण्याचा इशारा भारतीय जनता पार्टी तर्फे देण्यात आला असून याबाबतचे एक निवेदन तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर यांनी आपल्या सहकाऱ्यांसमवेत सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता यांना देण्यात आले आहे.

त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे कि, पावसाळ्यामुळे मुरुड ते साळाव तसेच मुरुड ते मिठागर या भागातील रस्त्यांना



ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत तर अनेक ठिकाणी रस्ते नादुरुस्त झाल्याने वेळ प्रसंगी अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे वाहनचालक, प्रवासी व नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून मणक्यांच्या विकारात वाढ झाली आहे.याबाबत वेळोवेळी अर्ज, विनंत्या व निवेदन सादर करण्यात येऊन कार्यक्रम रस्त्याची दुरवस्था जैसे थे अशीच आहे. असे भारतीय जनता पार्टी तर्फे देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले असून येत्या आठ दिवसांत मुरुड ते तेलवडे, खार आंबोली ते आगरदांडा तसेच मुरुड ते मजगांव रस्त्यावरील खड्डे बुजविण्यात येऊन डांबरीकरण न करण्यात आल्यास याविरोधात दि. १३ फेब्रुवारी रोजी रास्तारोको आंदोलन छेडण्यात येईल व त्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आ-पणावर राहिल. असे महेंद्र चौलकर

..../२

# खिळे काढा, सतरंज्या अंथरा

सत्याचा आग्रह धरताना निर्धार, सहनशीलता आणि अहिंसा या तीन शस्त्रांचा वापर करीत विरोधकांना हतबल करण्यात कायम यशस्वी ठरलेल्या आणि जगभर वंदनीय असलेल्या महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत आपला लढा सुरू ठेवण्याचा निर्धार राजधानी दिल्लीच्या सीमांवर ठाण मांडून बसलेल्या हजारो शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे. गेल्या वर्षी नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस सुरू झालेले हे आंदोलन एवढे लांबणार नाही याची, एवढे टोकाला जाणार नाही याची काळजी आता केंद्र सरकारनेच घ्यायला हवी. आंदोलक हे आपले विरोधक आहेत असे समजून त्यांना वागणूक देणे बंद केले पाहिजे. मंजूर करवून घेतलेल्या तीन विधेयकांद्वारे सरकार शेतकऱ्यांच्या हिताचा, प्रगतीचा दावा करत आहे. परंतु ज्यांच्या हिताचा दावा केला जातो आहे तेच जर समाधानी नसतील आणि 'शेंडी तुटो वा पारंबी' म्हणत रस्त्यावर उतरत असतील तर सरकारनेही थोडे सबुरीने घ्यायला हवे. या नव्या कायद्यांमुळे आपण रस्त्यावर येऊ किंवा आपले नुकसान होईल या काळजीपोटी, भीतीपोटी शेतकरी किंवा त्यांचे नेते हट्टाला पेटले असतील तर ते समजू शकते. सरकारनेही तशीच हट्टी, आग्रही भूमिका घेण्याचे, प्रतिष्ठेचा प्रश्न करण्याचे कारण नाही. या कायद्याच्या उपयुक्ततेबाबत दोन्ही बाजूंनी जोरदार 'मत'बाजी केली जात आहे ती बहुशः राजकीय स्वरूपाची आहे. मात्र, शेतकऱ्यांच्या हिताचा दावा करणारे हे कायदे मंजूर करताना त्याच्या मसुद्यावर संसदेत चर्चा घडवून आणण्याची लोकशाही प्रक्रिया का पार पाडली गेली नाही, याचे उत्तर द्यायला सत्ताधारी तयार नाहीत. विरोधक सत्तेवर असताना त्यांनी या कायद्यांचे समर्थन केले होते, असा आरोप सत्ताधारी गेले दोन महिने करत आले आहेत. हे वास्तव असेल तर संसदेत विरोधकांना कोंडीत पकडण्याची ती एक उत्तम संधी होती. 'काँग्रेसच्या पापांचा' सतत उच्चार करणाऱ्या सरकारने ही सुवर्णसंधी सोडली आणि चर्चेविना कृषी कायदे मंजूर करून घेतले, यातले गूढ त्यामुळेच अधिक गडद झाले आहे. या कायद्यांच्या विरोधात शांतपणे आणि धीराने सुरू असलेले आंदोलन ही म्हणूनच जगाने दखल घ्यावी अशी घटना ठरली. प्रजासत्ताकदिनी झालेल्या हिंसाचाराला जबाबदार कोण होते हे चौकशीत समोर येईलच; परंतु तोवर हे आंदोलन अत्यंत शांततेने सुरू होते, हे सरकारलाही मान्य करावेच लागेल. मात्र आंदोलकांचा हा समंजसपणाच कदाचित काहींना अडचणीचा वाटलेला असू शकतो. 'काट्याने काटा काढण्याची' वृत्ती किंवा कृती हे केंद्रातील या भाजप सरकारचे एक खास वैशिष्ट्य आहे. साहित्यिकांनी पुरस्कार परत केले की लगेचच साहित्यिकांचा आपल्या बाजूचा एक गट मैदानात उतरवायचा. काही विचारवंतांनी सरकारच्या निषेधाचे पत्रक काढले की लगेचच सरकारची बाजू मांडणारे पत्रक काढणारी विचारवंतांची दुसरी टोळी उभी करायची, असे वारंवार दिसून आले आहे. आताही, शेतकरी आंदोलनाच्या बाजूने काही विदेशी कलावंतांनी, प्रसिद्ध व्यक्तींनी ट्विट करताच सरकारने भारतातील कलावंतांना हाताशी धरुन ट्विटर युद्ध छेडले. रस्त्यावर एखादी कार आणि सायकल यांच्यात टक्कर झाली तर लोक स्वाभाविकरीत्या सायकलवाल्याची बाजू घेतात; कारण दर्शनी तो कमजोर दिसतो. मंजूर झालेले कृषी कायदे, त्यांचे बरे-वाईट परिणाम आणि त्यातील खाचाखोचा जिथे अनेक भारतीयांनाही नीट सांगता येणार नाहीत, तिथे या विदेशी कलावंतांनी ते समजून घेऊन शेतकऱ्यांना पाठिंबा दिला असेल, असे समजणे बावळटपणाचे आहे. परंतु रस्त्यावर उतरून, निर्धाराने लढणाऱ्या शेतकऱ्यांबद्दल त्यांना सहानुभूती वाटली तर नवल नाही. ते सरकारने एवढे मनाला लावून घेण्याची आवश्यकता नव्हती. प्रत्युत्तर दिल्यामुळे अधिक चेव येऊन आंतरराष्ट्रीय कलावंतांनी पाठिंबा देण्याचे प्रमाण उलट वाढतेच आहे. नवनव्या नावांची त्यात भर पडते आहे. हे आंदोलन केवळ काही राज्यांपुरते सुरू आहे असे दिसत होते, ती परिस्थिती हळूहळू बदलत आहे. महाराष्ट्राच्या काही भागात शनिवारी 'चक्का जाम'ला चांगला प्रतिसाद मिळाला. देशात इतरत्रही वातावरण तापते आहे. राकेश टिकैत यांचे नेतृत्वही या आंदोलनाने मोठे केले असून, दोन ऑक्टोबरची तारीख जाहीर करुन अप्रत्यक्षपणे गांधीजींशी हा लढा जोडून घेण्यात त्यांची हुशारीच दिसून येते. आपल्याच जनतेच्या आग्रहास्तव एखाद्या कायद्याचा पुनर्विचार करण्यात कमीपणा नाही. कदाचित सरकारचीच बाजू बरोबर असेल, तर ते पटवून देण्यास सरकारने पुरेसा वेळ दिला पाहिजे. विरोधकांचे वागणे दुटप्पी असेल तर तेही या प्रक्रियेत उघडे पडतील. तेव्हा वाटाघाटींच्या मार्गातील खिळे काढून टाकून सरकारने आता लवकरात लवकर लाल गालिचे नाही, तर किमान समजुतीच्या सतरंज्या तरी अंथरायला हव्यात.

# राज्यस्तरीय सन्मान पनवेल शिक्षकवृंदांचा सोहळा झेडपी लाईव्ह एज्युकेशनचा

**दै.रायगड नगरी । पनवेल**



झेडपी लाईव्ह एज्युकेशन घरातच सुरू झाली ऑनलाइन शाळा covid १९ कोरोना काळात या उपक्रमांतर्गत झूम द्वारे ऑनलाईन पाठ घेऊन विद्यार्थ्यांचे अध्ययन अध्यापन करणे तसेच या ऑनलाइन पाठाचे यु ट्यूब वर प्रक्षेपण करणे जेणेकरून हे पाठ सर्व विद्यार्थ्यांना केव्हाही कधीही अभ्यासता येतील आणि पाहता येतील व त्याचा उपयोग सतत शैक्षणिक प्रगतीत मार्गदर्शक होतील. यासाठी स्वयंप्रेरणेने सदर उपक्रमात सहभागी असणाऱ्या सर्व शिक्षकवृंदांचा राज्यस्तरीय सन्मान अर्थात राज्यस्तरीय शिक्षक गौरव सन्मान सोहळा नुकताच औरंगाबाद येथे पार पडला.

या कार्यक्रमासाठी ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू शिक्षण राज्यमंत्री महाराष्ट्र राज्य यांची प्रमुख उपस्थिती मार्गदर्शन लाभले. तसेच या सोहळ्यासाठी गोंदवले, मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प औरंगाबाद मा उपसंचालक शिक्षण साबळे, शिक्षणाधिकारी जयस्वाल, जि.प औरंगाबाद यांच्या उपस्थिती या कार्यक्रमला लाभली. कोरोना काळामध्ये जागतिक महामारी व जगभरात एक भयावह अनिश्चित परिस्थिती असतानाही या परिस्थितीवर मात करत असताना विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये व आपल्या शाळा बंद असूनही शिक्षण सुरू राहावे यासाठी ऑनलाइनच्या माध्यमातून झूम ॲपद्वारे पाठ घेऊन त्याचे युट्युब वर लाइव्ह प्रक्षेपण करणे तसेच अध्ययन निष्पत्ती नुसार इयत्ता पहिली ते पाचवीच्या वर्गाचे सर्व विषयांचे सर्व पाठ यशस्वीपणे घेऊन त्यावर आधारित मूल्यमापन यासाठी अँप निर्मिती करणाऱ्या सर्व शिक्षक वृंदांना यावेळी सन्मान करण्यात आले. ॲप उद्घाटन सोहळा यावेळी संपन्न झाला. या उपक्रमांमध्ये मध्ये रायगड जिल्ह्यातील रायगड जिल्हा परिषद शिक्षण विभाग तालुका पनवेल तालुक्याच्या टीमने विशेष सहभाग नोंदवला आहे. कोरोना काळात स्वतः कोरोनाग्रस्त असताना तसेच घरातील करोना ग्रस्त व्यक्तींची सेवा करत शासन प्रशासनाने दिलेली सर्व प्रकारची जबाबदारी सांभाळत संपूर्ण तयारीनिशी व विविध शैक्षणिक पद्धतीने वेगवेगळ्या अध्ययन अध्यापनाचे तंत्र व शैलीचा व डिजिटल साहित्य वापरून अतिशय उत्कृष्ट व दर्जेदार पाठ सादर करून पनवेल टिमने आपले मोलाचे योगदान दिले व आपला सहभाग नोंदवला हे पाठ घेत असताना आधुनिक अध्ययन अध्यापनाचे डिजिटल तंत्रज्ञान स्वतः शिकून स्वतः समृद्ध होऊन आपल्या अध्यापनाचा अध्ययन अध्ययपनाचा अनुभव महाराष्ट्रातील सर्व विद्यार्थ्यांना देण्यासाठी प्रयत्नशील अग्रेसर असणाऱ्या पनवेल तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षक अर्थात रायगड जिल्हा परिषद शाळांमधील शिक्षकांचा यावेळी गौरव करण्यात आला. राज्यभरातील सावित्रीच्या लेकी या कार्यक्रमात अतिशय हिरीरीने व आघाडीने पुढे होत्या. स्वतः च्या शाळेतील विद्यार्थ्यांचे ऑफलाइन ऑनलाईन शिक्षण घेत असताना त्याच बरोबर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शिक्षणासाठी सर्व शिक्षकवृंद प्रयत्नशील होते. ऑनलाईन पाठाचे सादरीकरण यावरच न थांबता विद्यार्थी मानसिक विकास ज्ञान मनोरंजन आनंद तंत्रज्ञान झेप साधण्यासाठी गंमतशाळे या रविवारच्या उपक्रमात सुद्धा कला कार्यानुभव रांगोळी व माहिती तंत्रज्ञानाचे विविध यशस्वी पाठ शिक्षकांनी घेतले तसेच मूल्यमापन प्रक्रियेतील टेस्ट सिरीज निर्मितीमध्ये सुद्धा सहभाग घेतला. या सन्मान सोहळ्याच्या वेळी या उपक्रमात सहभागी असलेल्या या टीममध्ये या परिवारातील ज्येष्ठ शिक्षिका सौ जयश्री मोहिते यांनी विचारमंचावर आपली मते मांडताना अतिशय सुंदर आणि प्रभावशाली उपक्रम जो राज्यातील सर्व विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल हा उपक्रम महाराष्ट्रभर नव्हे भारतभर पोहोचला पाहिजे जेणेकरून जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना याचा लाभ होईल यासाठी शासन स्तरावर प्रयत्न व्हावेत आणि विद्यार्थ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे असे मनोगत व्यक्त केले. या उपक्रमांमध्ये सहभागी रायगड जिल्हा परिषद शाळांमधील पन-वेल तालुक्यातील सहभागी शिक्षकवृंदांना रायगड जि.प शिक्षण विभागातील सर्व मान्यवर अधिकारी केंद्रप्रमुख मुख्याध्यापक सहकारी शिक्षकवृंदांचे विशेष मार्गदर्शन व सहकार्य लाभले या गौरवासाठी विद्यार्थी ग्रामस्थ SMC पालक यांच्याकडून सर्व शिक्षकवृंदांचे कौतुक होत आहे. शिक्षक वृंद खालील प्रमाणे.

जयश्री मोहिते, चित्ररेखा जाधव, नंदिनी कदम, ज्योती भोपी, रजनी इंगळे, सारिका रघुवंशी, अक्षता पाटील, योगीनी वैदू, सिमा गायकवाड, कोसमकर मँडम, विभावरी संगासने, विद्या म्हात्रे, स्मिता म्हात्रे, सिमा ससाने, मनोज म्हात्रे, अमित लंभाते, राजेंद्र चौधरी, शर्मिला उपरे, अपेक्षा पिंपळे, वृंदा धामणस्कर, भाग्यश्री केदार, स्मिता सावंत, अपेक्षा पिंपळे, रेखा गायकवाड, वंदना साळवी शिक्षकांनी विद्यार्थीसाठी केलेले काम सर्वांसाठी मोफत उपलब्ध करुन देऊन केलेला हा अनोखा उपक्रम म्हणजे माना की अंधेरा घना है मगर दिया जलाना कहा मना है एक उर्जस्वल सोहळ्याचे आम्ही मानकरी शिलेदार असल्याचा अभिमान आहे असे गौरवोदगार टिम सदस्या सौ चित्ररेखा जाधव यांनी व्यक्त केले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, मौजे : गव्हाण, ता.पनवेल, जि.रायगड येथील गट क्र.३६०, हि.नं.२/क, क्षेत्र २ हे.-२४ आर.१० चौ.मी. अधिक वरकस ० हे.-१४आर. २० चौ.मी. मिळून एकूण क्षेत्र २हे.-३८आर.३० चौ.मी., आकार रु.६ पै १२ या मिळकतीपैकी १) श्री.विरेन मनोहर देशमुख, २) श्रीमती.प्रणाली मनोहर देशमुख, ३) श्रीमती.मनिषा मनोहर देशमुख आणि ४) श्रीमती. पुजा मनोहर देशमुख यांच्या सामाईक मालकीची ०हे.-३०आर.०० चौ.मी. इतक्या क्षेत्राची मिळकत आमचे अशिलांनी त्यांचेकडून मोबदल्यापोटी कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीमध्ये अगर तिच्या कोणत्याही भागावर कुणाही तिऱ्हाईतांचे गहाण-दान, बक्षिस, फरोक्त, करारनामा, एम.ओ.यु., हुकूमनामा, मनाई आदेश, जप्ती, वहिवाट, हिस्सा अगर त्याप्रकारचे कोणतेही हक्क-हितसंबंध निगडीत असल्यास अगर सदर व्यवहारांस कुणाचीही हरकत असल्यास अशा हितसंबंधीत व्यक्ती, संस्था इत्यादींनी त्यांची लेखी हरकत जरुर त्या कागदोपत्री पुराव्यानिशी सदर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा (१५) दिवसांचे आत आमच्या खालीलप्रमाणेच्या पत्यावरील कार्यालयात सादर कराव्यात. अन्यथा सदर मिळकतीवरील श्री.विरेन मनोहर देशमुख वगैरे ४ यांचे मालकी हक्क हितसंबंध निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर आलेल्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत, हे सर्व जाहीर व्हावे.

पनवेल
दि.९/२/२०२१

**सही/-**
**ॲड.सारीका शेगट-लबडे**
**शॉप नं.३, घर नं.२२२, लबडे हाऊस, नवी पोसरी-मोहोपाडा,**
**पो.रसायनी, ता.खालापूर,**
**जि.रायगड-४१०२०२**
**मो.नं.०९९७५७७७९८९**


## वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com


# चोरांच्या सुळसुळाटामुळे ग्रामीण भागात सतर्कता

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

सध्या ग्रामीण भागात चोरांनी आपली करामत दाखवायला सुरुवात केली असून जनतेने सतर्कता बाळगली असून ग्रामीण भागात पुन्हा एकदा चोरांनी घरफोड्या, चोऱ्यांचे सत्र अवलंबलेले दिसून येत आहे. कोलाड वरसगाव येथे घरफोडी करून २६ हजारांचे दागिने आणि रोख रक्कम लंपास करून चोरटे पसार झाले. हळूहळू चोर आता ग्रामीण भागात दहशत माजवत असून थंडीचा फायदा घेऊन माणसे साखरझोपेत असताना बंद घर किंवा घरातील कडीकोयंडा सावधपणे तोडून घरात प्रवेश करून किमती वस्तू चोरतात.

चार वर्षांपूर्वी बंद घर तसेच ब्लॉकची टेहाळणी अगोदर करून रात्रीच्या सुमारास घरफोडी करून घर किंवा ब्लॉक साफ करायचे. ग्रामीण भागातील बरीचशी कुटुंब नोकरीनिमित्त आपले घर बंद करून शहरात आहेत. याचा फायदा भुरट्या चोरांनी घेऊन अनेकांची घरे फोडली होती. यामुळे त्यावेळी ग्रामस्थांना पहारेकऱ्यांच्या पाळ्या लावून जागता पहारा ठेवला होता. त्यामुळे हळूहळू चोऱ्यांचे प्रमाण कमी झाले होते. आता मात्र पुन्हा भुरटे चोर डोके वर काढत असून ग्रामीण भागातील ग्रामस्थ सतर्क रहात आहेत. मात्र आता पुन्हा पोलिसांसमोर आव्हान उभे राहिले आहे.


मा.न्यायमूर्ती सराफ साो.
ॲड.एस.एन.तेलगे

## जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.ज्युडी.मॅजिस्ट्रेट प्रथमवर्ग यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज क्र.३९/२०२१
ने.ता.२३/३/२१

श्री.कृष्णा रामचंद्र पंदेरकर
वय : ४३ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ओमकार कृष्णा पार्क II
ए-विंग/२०६, विचुंबे गाव,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार
विरुद्ध
मा.ग्रामसेवक, ग्रामपंचायत
विचुंबे, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

ज्याअर्थी कै.रामचंद्र काशिराम पंदेरकर दिनांक २७/०४/२०१८ व आई कै.सुमिती रामचंद्र पंदेरकर यांचा दि.२३/१२/२०१७ रोजी रा.ओमकार कृष्णा पार्क II ए-विंग/२०६, विचुंबे गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाले आाहेत. मात्र त्यांच्या मृत्यूची नोंद जन्म मृत्यू नोंदवहीत झालेली नाही म्हणून अर्जदार यांनी या न्यायालयात सदर श्री.कृष्णा रामचंद्र पंदेरकर यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होणे कामी पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साो. यांचे न्यायालयात अर्ज केलेला आहे.

सदर श्री.कृष्णा रामचंद्र पंदेरकर व आई कै.सुमिती रामचंद्र पंदेरकर हे वर नमूद ठिकाणी मयत झाले आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसीचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती दाखविल्या नाही तर सदर न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहू व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.०५/०२/२०२१ रोजी दिली.

सही/- क.लिपीक फौ.न्याया, पनवेल
कोर्टाचा शिक्का
सही/- सहा. अधिक्षक फौ.न्याया, पनवेल



## जाहीर नोटीस

माझ्या अशिलांच्या वतीने तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, मयत कान्हा चोच्या पाटील यांचे वारस १) बारकूबाई कान्हा पाटील, २) श्री.प्रकाश काना उर्फ कान्हा पाटील, ३) श्री.गुरुनाथ कान्हा पाटील, ४) श्री.शिवनाथ कान्हा पाटील, ५) श्री.संतोष कान्हा पाटील, ६) इंदूबाई भगवान भोईर उर्फ इंदूबाई कान्हा पाटील, राहणार : पेंधर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड यांना सिडको लि.कडून, मौजे : नोड तळोजा, नवी मुंबई येथील फाईल नं.५११ ए प्रमाणे खालील वर्णन केलेल्या भूखंडाचे वाटप झालेले आहे. सदर भूखंड हे वर उल्लेख केलेले शेतकरी यांच्या संपादीत जमिनीच्या मोबदल्यात साडेबारा टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत सिडको लिमिटेड नवी मुंबईकडून खालीलप्रमाणे पात्रता मंजूर होवून करारनामा झाला आहे. वर नमूद शेतकऱ्यांनी खालील वर्णन केलेला भूखंड त्रिपक्षीय करारनामा, हस्तांतरण करण्याचे व विकण्याचे ठरविले आहे.

**मालमत्तेचा तपशिल**
**सिडको फाईल क्रमांक ५११ ए (तळोजा नोड)**

| नोड | सेक्टर | प्लॉट क्र. | क्षेत्र |
|---|---|---|---|
| तळोजा | २३ | ९ | ७६४.७२ चौ.मी. |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये कोणाचाही कोणताही मालकी हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिसपत्र, लिन, लिज, पोटगी, दावा, खरेदीखत इ.कोणत्याही प्रकारचे हितसंबंध हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर कागदपत्रासहीत लेखी हरकत दाखल करावी किंवा प्रत्यक्ष संपर्क साधावा. त्यानंतर येणाऱ्या हरकतींचा विचार केला जाणार नाही. मुदतीत हरकत न घेतल्यास ज्यांचे हक्क आहेत ते स्वखुशीने सोडून दिले आहेत असे समजले जाईल. मुदतीत हरकती आल्या नाहीत तर सदरची मिळकत निर्वेध आहे असे समजण्यात येईल. सदर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत जर आवश्यक त्या पुराव्यासहीत हरकत नोंदविली नसेल तर त्याची नोंद घेतली जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड.सुजाता जो.पाटील**
**विसावा को.ऑप.हौ.सो., प्लॉट नं.ई१२४/१३, सेक्टर १२,**
**खारघर, नवी मुंबई-४१०२१०**
**मो.नं.८८७९४१६४८३**



## सावधान नोटीस

तमाम लोकांस या सावधान नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल डॉ.संदीप राजाराम शिंदे, रा.दुसरा मजला, प्लॉट नं.६०३ अ/२, योगेश्वर प्रसाद बंगला, टिळक रोड, जुना पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड यांचे वडील स्व.राजाराम पांडुरंग शिंदे हे दि.२३/०६/२००६ रोजी मयत झाले असून सदरहू त्यांच्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे : जुने पनवेल, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**
**पनवेल महानगरपालिका हद्दीतील पलॉट/भूमापन क्र.६०३ अ/२, क्षेत्र २४२.५० चौ.मी., योगेश्वर प्रसाद बंगला, ता.पनवेल, जि.रायगड**

तरी वर नमूद मिळकत आमचे अशिल डॉ.संदीप राजाराम शिंदे, त्यांची आई, बहिण व मयत स्व.भावाचे वारस हे मयत स्व.राजाराम पांडुरंग शिंदे यांच्या मृत्यूच्या पश्चात सर्वांचे मिळकतीवर हितसंबंध अधिकार असताना माझी आई श्रीमती.वनिता राजाराम शिंदे ह्यांनी परस्पर मालमत्ता पत्रक आपले स्वतःचे नावी केले आहे.

तरी वर नमूद मिळकतीचा वा मिळकतीच्या कोणत्याही भागाचा अन्य कोणत्याही प्रकारचा खरेदी विक्री करार किंवा बांधकाम विकास करार अथवा कोणत्याही प्रकारचा व्यवहार हा आमच्या अशिलांच्या संमती/परवानगी शिवाय व्यवहार करू नये.

वरील वर्णनाच्या मिळकती संदर्भात अन्य कोणालाही व्यवहार करायचे असल्यास त्यांनी आमच्या अशिलांना प्रत्यक्ष भेटून व्यवहार/सल्लामस्सलद करावा.

सदर मिळकतीचे पनवेल न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. आमचे अशिल यांचा वर नमूद मिळकतीमध्ये हिस्सा हितसंबंध आहे. तरी तमाम जनतेस आव्हान करतो की, आमच्या अशिलांच्या अपोरक्ष / विना परवानगीने व्यवहार केला तर त्यांच्यावर दिवाणी आणि फौजदारी प्रकारची कारवाई करण्यात येईल. होणाऱ्या सर्व खर्चास आपण स्वतः जबाबदार असाल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल
दि.८/२/२०२१

**सही/-**
**ॲड.सचिन बाबुराव कांबळे**
**कार्यालय/निवास : घर नं.१३७,**
**मु.पो.खारघर गाव, सेक्टर १३,**
**लुंबिनी बुद्ध विहार जवळ,**
**ता.पनवेल, जि.रायगड**
**नवी मुंबई-४१०२१०**


पृष्ठ क्र.१ वरुन...

# भरीव निधी उपलब्ध करून देणार : ना.आदिती तटकरे

शैलीतील सूत्रसंचालनाने कार्यक्रमात रंगत आणली. या कार्यक्रमात पालकमंत्री आदिती तटकरे व माजी आमदार धैर्यशील पाटील यांच्या हस्ते सन १९५८ पासून सरपंचपद भूषविणाऱ्या सर्व सरपंच यांचा यथोचित सन्मानित करण्यात आले. याबरोबरच सर्व अंगणवाडी सेविका व आशा वर्कर यांचा ही यावेळी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना उत्तमराव देशमुख यांनी ग्रामपंचायत कार्यकाळ व एकूणच वाटचालीचे विश्लेषण केले. दीपक पवार यांनी ग्रामस्थांच्या वतीने काही मागण्या सादर केल्या यामध्ये अनेक गावांना जोडणाऱ्या आवंढे या महत्वपूर्ण पुलाला वाढविणे, वाघोशी ग्रामपंचायतीचे वरील सभागृह बांधणे, तसेच कवेळे अंतर्गत रस्त्याचे डांबरी करण करणे याकामी निधीची तरतूद करणेबाबतची विनंती केली. यावर पालकमंत्री आदिती तटकरे, धैर्यशील पाटील व अन्य मान्यवरांनी सकारात्मक भूमिका दर्शविली.

यावेळी प्रमुख अतिथी पालकमंत्री आदिती तटकरे,माजी आमदार धैर्यशील पाटील, जि प अर्थ व बांधकाम सभापती ॲड नीलिमाताई पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या रायगड महिला अध्यक्षा सौ गीताताई पालरेचा, जि. प सदस्य सुरेशशेठ खैरे, जे. बी. गोळे, माजी सभापती, साक्षीताई दिघे, माजी सभापती भारतीताई शेळके, सुधागड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष रमेश साळुंके, सुधागड तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन किसनराव उमठे, राष्ट्रवादी सुधागड तालुका युवक अध्यक्ष संदेश शेवाळे, उत्तमराव देशमुख, सरपंच सौ. अंकिता चिले, उपसरपंच दीपक पवार, ललित ठोंबरे, प्रांताधिकारी डॉ. यशवंत माने, तहसीलदार दिलीप रायन्नावार, पोलीस निरीक्षक विजय तायडे, शेखर डोंगरे, अभिजित चांदोरकर, सुलतान बेनसेकर, सुशील शिंदे, आदींसह पदाधिकारी, ग्रामस्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी दर्शना मांढरे, रेश्मा खेडेकर, रसिका देशमुख, सुप्रिया लटके, उत्तमराव देशमुख, संदेश देशमुख, संकेत बिरवाडकर, अनिकेत तळकर, विशाल चिले, हेमंत मुजुमदार, सुहास कुर्ले, दशरथ मांढरे, निवास सोनावळे, सर्व ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, कर्मचारी, आदींनी अविरत मेहनत घेतली.

# मजगांव-मुरुड-आगरदांडा रस्त्याची दुरवस्था

यांनी म्हटले असून सदर निवेदनाच्या प्रती राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस, मुरुड तहसीलदार व पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या आहेत. यावेळी भा.ज.पा.तालुका अध्यक्ष महेंद्र चौलकर, भटक्या विमुक्त जाती रायगड जिल्हा अध्यक्ष शैलेश काते, शहर अध्यक्ष उमेश माळी, तालुका उपाध्यक्ष विनोद (बाळा)भगत, सरचिटणीस नरेश वारगे, तालुका संघटन सरचिटणीस प्रवीण बैकर, हनिफ उलडे, जनार्दन खोत, जीवन सुतार,सुदाम वाघिलकर यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## अलिबाग शासकीय मूकबधीर विद्यालयास पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांची भेट

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्हा व कोकण विभागातील कर्णबधीर मुलामुलींच्या शिक्षणाची सोय व्हावी, यासाठी शासनाने अलिबाग येथे शासकीय मूकबधीर विद्यालय सन १९६३ सालापासून सुरु केलेले आहे. या इमारतीस ३४ वर्षे कालावधी झाल्यानंतर आता या इमारतीची जीर्णावस्था झालेली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने ही इमारत सन २०१७ मध्ये धोकादायक इमारत म्हणून घोषित केली आहे. यानुषंगाने या इमारतीची पाहणी पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी शनिवार, दि.०६ फेब्रुवारी २०२१ रोजी केली.

त्यांच्यासमवेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील, समाज कल्याण अधिकारी गजानन लेंडी, तहसिलदार सचिन शेजाळ, महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष साईनाथ पवार, शाळेचे अधीक्षक श्री. किशोर वेखंडे तसेच समाज कल्याण विभागातील अधिकारी /कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी या इमारतीची सुसज्ज उभारणी होण्यासाठी आवश्यक असलेला निधी शासनाकडून कमी पडू दिला जाणार नाही. या इमारतीच्या पुर्नबांधणीसाठी नव्याने अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले असून मूकबधीर विद्यार्थ्यांना आवश्यक सोई–सुविधासह चांगले शिक्षण देण्यासाठी या इमारतीची पुर्नबांधणी होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने या इमारतीची आधुनिक पध्दतीची उभारणी करुन दिव्यांगांना अडथळा विरहित संचार व्यवस्था निर्माण करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

महाराष्ट्र राज्य दिव्यांग कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष साईनाथ पवार, शाळेचे अधीक्षक श्री. किशोर वेखंडे यांनी या शाळेविषयी माहिती देताना या विद्यालयासाठी सुरुवातीला २५ निवासी विद्यार्थी संख्येची मान्यता होती. या संस्थेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सन १९८६ मध्ये सुसज्ज इमारत उपलब्ध करुन देण्यात आलेली होती. इमारतीच्या उपलब्धतेनंतर संस्थेची प्रवेशित संख्या २५ वरुन ५० इतकी करण्यात आली. ही शाळा शासनाने धोकादायक इमारत घोषित केल्यामुळे सध्या शाळा भाडयाच्या इमारतीत भरविण्यात येत आहे, अशी माहिती उपस्थितांना दिली.

## नोकरी डॉट कॉमच्या माध्यमातून नोकरीच्या शोधात असलेल्या तरुणाला अज्ञात टोळीने घातला गंडा

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नोकरी डॉट कॉमच्या माध्यमातून नोकरी शोधण्याच्या प्रयत्नात असलेल्या तरुणाला अज्ञात टोळीने सुमारे ५७ हजारांची रक्कम उकळून त्याची फसवणुक केल्याचा प्रकार उघडकिस आला आहे. पनवेल तालुका पोलिसांनी या टोळी विरोधात फसवणुकिसह आयटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल करुन या प्रकरणाच्या तपासाला सुरुवात केली आहे.

या प्रकरणात फसवणुक झालेल्या तरुणाचे नाव स्वप्नील बर्वे (२२) असे असून तो पनवेरलच्या डेरवली भागात कुटुंबासह रहाण्यास आहे. गत मे महिन्यामध्ये स्वप्नीलने बीटेकची परिक्षा दिल्यानंतर तो क्वालीटी ऑफीसर या नोकरीचा शोध घेण्यासाठी त्याने नोकरी डॉट कॉम या वेबसाईटवर आपली वैयक्तिक माहिती भरली होती. त्यानंतर काही दिवसांमध्येच मनिषा नावाच्या महिलेने नोकरी डॉट कॉम मधुन बोलत असल्याचे सांगून स्वप्नीलच्या मोबाईलवर संपर्क साधला होता. त्यानंतर सदर महिलेने अमुल मिल्क लिमिटेड कंपनीमध्ये क्वालीटी ऑफिसरची व्हॅकेन्सी असल्याचे सांगून त्यासाठी स्वप्नीलला १५५० रुपये रजिस्ट्रेशन फि भरण्यास सांगितले. त्यानुसार स्वप्नीलने रजिस्ट्रेशन फिची रक्कम गुगल पेद्वारे पाठवून दिल्यानंतर अग्निहोत्री नामक व्यक्तीने अमुल मिल्क लि.कंपनीकडून फोनवरुन इंटरव्हयु घेत असल्याचे भासविले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मनिषाने त्याला फोन करुन त्याची नियुक्ती झाल्याचे सांगून त्याच्या मेडिकल सेक्युरीटीसाठी ८५०० रुपये, तसेच कंपनीसोबत बॉन्ड करण्यासाठी १२,५०० रुपये स्वप्नीलला भरण्यास सांगितले. त्यामुळे स्वप्नीलने आपल्याला नोकरी नको, सर्व व्यवहार रद्द करण्यास तिला सांगितल्यानंतर मनिषाने सदर व्यवहार रद्द करण्यासाठी ४१९० रुपये भरल्यानंतर त्याची संपुर्ण रक्कम त्याला परत मिळेल असे सांगितले. सदर महिलेच्या बोलण्यावर विश्वास ठेवून स्वप्नीलने सदरची रक्कम तिच्या खात्यावर पाठविल्यानंतर मनिषाने नेटवर्कच्या अडचणीमुळे सदर रक्कम मिळाले नसल्याचे सांगून त्याला ५५८९ इतकी रक्कम दुसऱ्या खात्यावर पाठविण्यास भाग पाडले. त्यानंतर देखील मनिषाने जीएसटी आणि सर्व्हीस टॅक्स अशी वेगवेगळी कारणे सांगुन त्याच्याकडून एकुण ५६ हजार ९७८ रुपये उकळले.

त्यानंतर देखील स्वप्नीलने आणखी २३ हजार रुपयांची रक्कम भरल्यास त्याला कंपनीकडून १ लाख रुपयांचा चेक दिला जाईल असे सांगण्यात आले. त्यानंतर आपली फसवणुक होत असल्याचे स्वप्नीलच्या लक्षात आल्यानंतर त्यांने पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी या गुह्यातील आरोपींविरोधात फसवणुकिसह आयटी ऍक्टनुसार गुन्हा दाखल केला.

## वाचन ही जीवनाची गुरुकिल्ली : आ.प्रशांत ठाकूर

### रायगड जिल्हा ग्रंथालय संघाच्या वार्षिक अधिवेशनाचे उद्घाटन



**दै.रायगड नगरी । पनवेल**

वाचन ही जीवनाची अजूनही गुरुकिल्ली आहे. ती अधिकाधिक लोकांच्या हाती जाऊन त्यांचे जीवन समृद्ध व्हावे, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि. ७) येथे केले. रायगड जिल्हा ग्रंथालय संघाच्या वतीने आयोजित वार्षिक अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते.

पनवेल येथील के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालय आणि रायगड जिल्हा ग्रंथालय संघ यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रंथालय संघाच्या ५५व्या वार्षिक अधिवेशनाला पनवेल येथील ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात रविवारी सकाळी प्रारंभ झाला. या अधिवेशनाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. उद्घाटन समारंभास रायगड जिल्हा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष संजय बोंदाडे, के. गो. लिमये सार्वजनिक वाचनालयाच्या अध्यक्ष सुनीता जोशी, शशिकांत बांदोडकर आदी मान्यवरांसह रायगड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणात आलेले प्रतिनिधी उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर यांनी नवीन पिढी सुशिक्षित होईल, पण सुसंस्कृत होण्यासाठी आपल्या आवडीचे वाचून अवती–भवतीचे अनुभवले पाहिजे. अनेकांनी आपली आयुष्य पुस्तकरूपात मांडलीत. ती तरुणांच्या हाती गेल्यास त्यांचे जीवन अधिक समृद्ध होईल, असे सांगितले.

## झाडाला कापडी गमछाच्या सहाय्याने गळफास घेवून आत्महत्या

**दै.रायगड नगरी । पनवेल**

घरामागील झाडाला कापडी गमछाच्या सहाय्याने अज्ञात कारणावरुन गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना तालुक्यातील गणेशनगर भागात घडली आहे.

मुकेश चंदेश्वर राय (२३) याने अज्ञात कारणावरुन तो राहत असलेल्या घराच्या मागील बाजूस असलेल्या करंजाच्या मोठ्या झाडाला कापडी गमछाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची घटना घडली. याबाबतची नोंद पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल
पिनकोड-४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०
ई-निविदा क्र. ५९ सन २०२०-२१

महाराष्ट्र राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पनवेल दूरध्वनी/फॅक्स क्रमांक -०२२- २७४५२७७८/ ०२२-२७४६७४४० महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्याकडून **जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार कंत्राटदाराला** खालील कामाकरीता बी-१ नमून्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागवित आहेत.निविदा कागदपत्र शासनाच्या संकेतस्थळावर https//mahatenders.gov.in येथे उपलब्ध असतील. तसेच निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे.अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित किंमत (रु.लक्ष) | नोंदणी वर्ग | ई-निविदा संचाची किंमत जीएसटी धरुन | काम पूर्ण करण्याचा कालावधी | कामाचे लेखाशिर्षक |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे खैरवाडी (ग्रा.पं.खैरवाडी) येथे अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे,ता.पनवेल जि.रायगड | 8.36 | वर्ग-७ | 600.00 | ०६ महिने | ४५१५-आमदार निधी |
| २. | मौजे शिवकर गावात शिवाजी मंदीर ते किसन भोईर घरापर्यंत येथे अंतर्गत रस्ता कॉक्रीटीकरण करणे, ता.पनवेल जि.रायगड | 8.38 | वर्ग-७ | 600.00 | ०६ महिने | ४५१५-आमदार निधी |

ई-निविदा उपलब्ध कालावधी : दिनांक १२.०२.२०२१ ते दिनांक १९.०२.२०२१
ई-निविदा उघडणे (शक्य झाल्यास) : दिनांक २२.०२.२०२१

**निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता सा.बां.विभाग, पनवेल यांनी राखून ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.**

**टिप :-**

१. सर्व पात्र/इच्छूक निविदाकारांनी निविदापत्रक डाउन लोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई-निविदा प्रणाली **https://mahatenders.gov.in**

२. निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व DSC डिजिटल प्रमाणपत्र वितरीत व Portal वर Enrollment करण्या संदर्भात काही शंका /अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.
**Toll Free No : 1800 3070 2232 , E-Mail : eproc.maharashtra@gmail.com, cppp-support@nic.in**

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्ताऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा /बयाणा रक्कम,ई-निविदा संचाची किंमत या बाबतचे दस्ताऐवजाच्या मुळ प्रती स्वत :च्या नावाची गोपनियता बाळगुण ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सार करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.

४. सादर केलेल्या निविदा कागदपत्राची प्रत : स्वतंत्र पाकिटात दिनांक १९.०२.२०२१ रोजी किंवा त्यापूर्वी कार्यालयीन वेळेत सादर करावी.

५. शासन निर्णयानुसार निम्नत्तम निविदाकारांचा (L-1) कमी दराबाबतचा (Performance Security) चा DD/FDR/B.G. लिफाफा क्र.२ (Financial Bid) उघल्याच्या दिनांका पासून ८ (आठ) दिवसांच्या आत या कार्यालयात सादर करण्यात यावा.सादर करण्यात यावा.सादर न केल्यास निम्नत्तम निविदाकाराची (L-1) इसारा रक्कम (EMD) शासन जमा करण्यात येईल व सदर निविदा कारास पूर्ण एक वर्षासाठी कोण्त्याही निविदा प्रक्रियेस सहभागी होता येणार नाही तसेच अशा निविदा नव्याने मागविण्यात येतील.

६. इतर अटी व शर्ती ई-निविदामध्ये पाहावयास मिळतील.

७. सदर कामाची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवले आहेत.

८. वरील कामाची ई-निविदा सूचना सार्वजनिक बांधकाम विभागाच्या www.mahapwd.com या इंटरनेट वरील वेबसाइटवर उपलब्ध आहे.


ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/४१९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :- ४/२/२०२१


कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग, पनवेल


## माणगांवचे निर्मळ श्रध्दास्थान गजानन महाराज मंदिराचा ७ वा वर्धापन दिन

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव येथील सुप्रसिध्द दानशूर व्यक्तीमत्व दोशी अण्णा यांनी स्वतःच्या मालकीची कचेरीरोड माणगांव पोलीस उपविभागीय कार्यालया शेजारी असलेली २२२०. ०० चौरस फूट जमिन २०१३ साली मंदिरासाठी दान दिली, २०१५ साली याच जागेवर श्री गजानन महाराजांचे भव्य मंदिर उभे राहीले आहे. याच मंदिराला यंदा ६ वर्ष पूर्ण होत असुन मंगळवारी ९ फेब्रुवारी २०२१ रोजी ७ वा वर्धापन दिन साजरा होणार, एकीकडे आनंद तर गतकालात मंदिर कार्यकारीणीचे लाडके सदस्य कै. संजय जोगळेकर यांचे अपघाती व दानशूर व्यक्ती कै. दोशी अण्णा यांचे वृध्दापकाळाने निधन झाल्याने या वर्धापन दिनाला एक दुःखाची किनार लागली असल्याचे मंदिर अध्यक्षा अंजली कुलकर्णी यांनी पत्रकारांजवळ बोलताना म्हटले आहे.





दरवर्षी या मंदिराचे लेखापरिक्षण करण्यात येते, प्रामाणिक व शिस्तप्रिय कारभारामुळे अल्पावधित लौकीकप्राप्त या मंदिरासाठी लोक मोठ्या विश्वासाने देणग्याही देतात. दरवर्षी प्रकटदिन सोहळा तसेच सहा वर्षात अत्यंत साधेपणात संस्कारक्षम समाजोपयोगी कोणताही दिखावा न करता विविध कार्यक्रमांचे आयोजनही करण्यात आले. यंदा दिनांक ०९ फेब्रुवारी वर्धापन दिनी सकाळी श्रीगजानन महाराज अभिषेक व दूपारी १२. ०० वाजता महाआरती तसेच दुपारी ४ ते ६ या वेळेत हौशी कलाकारांचा भाव संध्या हा भक्ती संगितावर आधारीत कार्यक्रम व नेहमीच्या वेळेत ०७. ०० वाजता श्रींची आरती व त्यानंतर उपस्थित भाविकांसाठी अल्पोपहाराची व्यवस्था ठेवण्यात आली आहे. मंदिर कार्यकारीणीच्या वतिने सर्व माणगांवकरांनी दर्शनाचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

माणगांव मधिल हे मंदिर दिवसेंदिवस अत्यंत लोकप्रीय होत असुन जवळपास पाच तालुक्यातुन मोठ्या श्रध्देने या ठिकाणी गण गण गणांत बोते चा गजर करीत भाविक दर्शनासाठी येतात. अनेक भाविकांना मनःशांती व चांगले लाभ झाल्याचा अनुभव येत आहे. येथिल मंदिर कार्यकारीणीची पाचवर्षासाठी निवडली गेली असुन अंजली कुलकर्णी या अध्यक्षपदाची जबाबदारी पार पाडतात. इतर पदाधिकारी म्हणुन आव्हाड दादा, संजय जोशी, मृणाल रायकर, प्रमोद झेमसे, मंजिरी बापट, काम पाहतात तर विश्वस्त म्हणुन कै. दोशी अण्णा, यशवंत कुलकर्णी, अनघा गुळवणी, मानसी खरे, उज्वला गोडसे, सुरेखा गांधी, अस्मिता तलाठी, शर्मिला रायकर, कै. संजय जोगळेकर अशा पंधरा जणांचा समावेश आहे.

## १९ वर्षीय तरुणीवर करण्यात आला सामुहिक बलात्कार

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शितपेयातून मद्य पाजून दोघा तरुणांनी १९ वर्षीय तरुणीवर लैंगिक अत्याचार केल्याची घटना खारघर वसाहतीमध्ये घडली आहे.

खारघर वसाहतीमधील सेक्टर १२ येथील एका १९ वर्षीय तरुणीची बस चालकाशी ओळख झाली होती. सदर बस चालकाने व त्याच्या मित्राने या तरुणीला बोलावून शितपेयातून दारु पाजली. त्यानंतर दोघांनी तिच्यावर लैंगिक अत्याचार केला व तिला सेक्टर १८ मधील संजीवनी शाळेसमोरील रस्त्यावर फेकून ते पसार झाले होते. दरम्यान सदर तरुणी घरी न आल्याने तिचे कुटुंबिय शोध घेत असताना ती त्यांना सदर ठिकाणी बेशुद्ध अवस्थेत पडलेली आढळली. याबाबत त्वरित खारघर पोलिसांनी त्या ठिकाणी धाव घेवून तिला उपचारार्थ रुग्णालयात दाखल केले. तरुणी शुद्धीवर आल्यावर तिने घडलेला प्रकार खारघर पोलिसांना सांगितला आहे. या प्रकरणी एका आरोपीस पोलिसांनी ताब्यात घेतल्याचे समजते.


**जाहीर नोटीस**

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खाली नमूद केलेली शेतजमीन मिळकत ही खाली लिहिलेल्या जमीन मालक यांचे नावावर ७/१२ उताऱ्या सदरी महसूल दप्तरी नावे असून ती त्यांचे खुद्द, ताबा, कब्जा मालकी, वहिवाटीतील आहे. त्या शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :–

**मौजे : वावंजे, ता.पनवेल, जिरायगड, तलाठी सजा–वावंजे हद्दीतील**

| मालकाचे नाव | गट/भूमापन क्र. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. | भोगवटदार वर्ग–१ |
|---|---|---|---|---|
| १) ईस्माईल इस्लाम अहमद खान<br>२) मोहम्मद ईस्माईल मोहम्मद इब्राहीम पटेल<br>३) मोहम्मद यासीन इब्राहीम पटेल | ८२/२/ब | ०–७१–२६<br>पो.ख.०–०६–६०<br>एकूण ०–७७–८६<br>यापैकी ०–५२–० | ९–१९ | |
| १) मोहम्मद यासीन इब्राहीम पटेल<br>२) मोहम्मद इस्माईल मोहम्मद इब्राहीम पटेल<br>३) ईस्माईल इस्लाम अहमद खान | ८१/१ | ०–२८–९० यापैकी ०–१०–० | ०–८५ | भोगवटदार वर्ग–१ |

**१) गट/भूमापन क्रं.८२/२/ब या सामाईक क्षेत्रापैकी वर नमूद केलेल्या मालकीच्या हिश्श्याचे क्षेत्र एकूण ०–७७–८६ या क्षेत्रापैकी ०–५२–० (गुंठे) इतके सामाईक क्षेत्र**
**१) गट/भूमापन क्रं.८१/१ या सामाईक क्षेत्रापैकी वर नमूद केलेल्या मालकींच्या हिश्श्याचे क्षेत्र एकूण ०–२८–९० या क्षेत्रापैकी ०–१०–० (गुंठे) इतके सामाईक क्षेत्र**

वरील मिळकतीसंबंधात आमचे अशिल यांनी जमीन मालक यांचेशी खरेदी व्यवहार ठरविला असून वरील मिळकतींवर अन्य कोणाचा, दान, गहाण, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, अखत्यारपत्र, लिएन, चार्ज, ॲटॅचमेंट, अन्न, वस्त्र, निवारा, कुळवहिवाट, ताबा, कब्जा वहिवाट, वचनचिठ्ठी, दावा, दरखास्त, जप्ती, मॉरगेज, संपादन, रिझर्व्हेशन, रेक्वीझिशन अगर अन्य प्रकारचा बोजा, हक्क, हितसंबंध तसेच एकत्र कुटुंब मिळकत असलयास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रत्यक्ष भेटून मुदतीमध्ये हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासह दाखल करावयात, तशा प्रकारच्या हरकती मुदतीत दाखल न केल्या गेल्यास सदरच्या वरील जमीन मालकांशी खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

हे कळावे,
दि.०९/०२/२०२१
ठिकाण : कळंबोली

सही/–
ॲड.सुनील एन.मोरे
ऑफिस नं.३०६०, सी विंग, बिमा कॉम्प्लेक्स प्रिमायसेस, प्लॉट नं.११९, सेक्टर–के डब्ल्यू सी, कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड–४१०२१८
मो.नं.८३६९४६५७९९/९९२०४५५७२७



महाराष्ट्र शासन
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,सा.बां.विभाग, पनवेल
पिनकोड-४१०२०६
E-mail- panvel.ee@mahapwd.com
दूरध्वनी क्रमांक ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०
ई- कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ५९ (ई-निविदा) सन २०२०-२१

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२- २७४५२७७८ फॅक्स — ०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकामखात्याकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदारांकडून कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सुचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.
टिप- या निविदेमध्ये एकूण ०१ ते ०२ कामे समाविष्ठ असुन ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक १२.०२.२०२१ सकाळी १०.०० ते दिनांक १९.०२.२०२१ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/ ४१९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय,
सा.बां.विभाग, पनवेल, जि.रायगड
दिनांक :- ४/२/२०२१

कार्यकारी अभियंता,
सा.बां.विभाग, पनवेल

क्र.जिमाका/राअ/जाहि/१४७/२०२०-२१